# सहामाही अहवाल

# जून ३०, २०११

नमस्कार मंडळी,

गेल्या सहा महिन्यात २०११ महाराष्ट्र मंडळ समितीने केलेल्या प्रगतीचा सारांश आपणासमोर मांडताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. महाराष्ट्र मंडळाचा विस्तार करणे, मराठी समाजाच्या बदलत्या संख्येनुसार व गरजेनुसार कार्यक्षेत्रात वाढ करणे तसेच सर्वप्रकारे महाराष्ट्र मंडळाची क्षमता वाढवण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

सर्वप्रथम **'संपर्कातून प्रगती'** हे ध्येय निश्चित करून, त्यानुसार अर्थपूर्ण प्रतिकाची निवड तसेच २०११ ची उद्दिष्टे ठरविण्यात आली.

**२०११ महाराष्ट्र मंडळ समितीची उद्दिष्टे:**

- उपलब्ध आर्थिक नियोजनानुसार कार्यक्रमाची गुणवत्ता जोपासून सभासद संख्या कायम ठेवणे वा त्यात लक्षणीय वाढ करणे.
- अटलांटा महाराष्ट्र मंडळाचे सर्व कार्यक्रम महाराष्ट्रीय व इतर लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी सतत प्रयत्नशील राहणे.
- महाराष्ट्र मंडळाच्या युवा पिढीचा सक्रीय सहभाग वाढवण्यासाठी त्यांना उद्युक्त करणे.
- अटलांटातील व भारतातील नि:सहाय्य लोकांसाठी सक्रियतेने मदतीचे उपक्रम चालवणे.
- महाराष्ट्र मंडळाच्या ध्येयास पूरक अशा दीर्घकालीन योजना राबविणे.

गेल्या सहा महिन्यात समितीने जे उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडलेत त्यातील काही कार्यक्रम हे पारंपारिक होते तर काही नवीन पण वैशिष्ट्यपूर्ण होते. ह्याची सविस्तर माहिती आणि छायाचित्रे खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. www.mmatlanta.org किंवा www.facebook.com/mmatlanta. आपण दिलेला भरघोस पाठींबा आणि प्रोत्साहन ह्यामुळेच हे सर्व कार्यक्रम आम्ही यशस्वीरीत्या पार पाडू शकलो त्याबद्दल धन्यवाद!

| महिना | उपक्रम / कार्यक्रम | ठळक घटना / निष्कर्ष |
|---|---|---|
| नोव्हेंबर - डिसेंबर २०१० | प्रतिक, ध्येय व उद्दिष्टे | ह्यावर्षी प्रथमच महाराष्ट्र मंडळ समितीचे प्रतिक व ध्येय ठरविण्यात आले. |
| | फेसबुक (www.facebook.com/mmatlanta) | विचारांची देवाण घेवाण करणे तसेच संवाद साधण्यासाठी प्रथमच फेसबुक ह्या माध्यमाचा वापर केला गेला. |
| जानेवारी | प्रत्यक्ष NFFC च्या साईटवर जाऊन काम करण्यात आले (www.nfcchelp.org) | युवा समितीचे २२ सदस्य व काही पालक ह्यांनी एक पूर्ण दिवस NFCC च्या साईटवर जाऊन गरजू लोकांना मदत केली. |
| | मकरसंक्रांत | १. युवा समितीने गणेश वंदना व राष्ट्रगीत सादर केले.<br>२. 'जब वुई मराठी' हा करमणूकप्रधान कार्यक्रम.<br>३. 'मराठी म्युझिकल मेलडी' - सादरकर्ते कलामंच ग्रुप, न्यू जर्सी<br>४. सामाजिक कार्य: पुस्तके, शालेय सामान व चष्म्याच्या फ्रेम गरजू लोकांना वाटण्यासाठी गोळा करणे.<br>५. MMA युवा समितीसाठी स्वतंत्र डेटाबेसची |

# सहामाही अहवाल

## जून ३०, २०११

| | | |
|---|---|---|
| | | निर्मिती. |
| फेब्रुवारी | भेटीगाठी | अटलांटामध्ये आलेल्या २० नवीन मराठी परिवारांचे स्वागत करून त्यांची मंडळाच्या नवीन व जुन्या सदस्यांची ओळख करून देण्यात आली. |
| | MMA दीर्घकालीन योजना<br>http://www.mmatlanta.org/survey_results.pdf<br>MMA २०११ च्या विश्वस्तांच्या सहाय्याने राबविलेला उपक्रम | महारष्ट्र मंडळाच्या ११० सदस्यांनी, मंडळाच्या भविष्यातील बदलत्या गरजांसाठी आवश्यक असलेल्या दीर्घकालीन योजनांचा अभ्यास व परीक्षण करून पुढील वाटचालीसाठी आवश्यक ते उपाय सुचविले. |
| मार्च | युवा समितीचे स्नेह-संमेलन | युवा समितीने पुढाकार घेऊन प्रथमच आयोजित केलेली एक आनंददायी संध्याकाळ! एकूण ३० युवा सदस्यांनी ह्या कार्यक्रमाचा आनंद लुटला. |
| | एकल विद्यालयाच्या चळवळीत सहभाग | शहरी व ग्रामीण भागातून निरक्षरतेचे समूळ उच्चाटन करण्याच्या मोहिमेस पाठींबा म्हणून MMA ने प्रथमच महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील, कारडा येथे एका शाळेतील ३० गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली. |
| एप्रिल | होळी- सेवा ह्या आंतरराष्ट्रीय संघटनेबरोबर प्रथमच केलेला जोडउपक्रम! | ह्या होळीच्या कार्यक्रमात महाराष्ट्र मंडळाच्या सभासदांबरोबरच इतरांचाही सहभाग होता. रंगाची उधळण, नाच-गाणी अश्या पारंपारिक पण अनोख्या पद्धतीने रंगलेल्या होळीच्या कार्यक्रमाचा आनंद सर्वांनी लुटला. |
| | MMA २०२० व्हिजन: टाउनहॉल मीटिंग<br>http://www.mmatlanta.org/One_Page_Summary.pdf<br>MMA २०११ च्या विश्वस्तांच्या सहाय्याने राबविलेला उपक्रम | या सभेला २००० पासूनच्या सर्व माजी अध्यक्षांसहित ४२ सभासद उपस्थित होते. यावेळी 'MMA चार्टरची उजळणी' आणि 'स्वतःच्या मालकीच्या जागेचा शोध' हे दोन उपक्रम राबविण्याबाबत सर्वांनी सहमती दर्शवली. |
| | गुढीपाडवा | १. "अभंगवाणी - भीमसेन जोशींना एक श्रद्धांजली!<br>२. अफलातून परिवार - एक पारिवारिक प्रतियोगिता!<br>३. युवा समितीतर्फे 'नॉट टेक्सटिंग व्हाईल ड्राईव्हिंग प्लेज' आणि 'बुक कलेक्शन ड्राईव्ह'.<br>४. सर्वसाधारण सभेने एकमताने मंजूर केलेले खालील ठराव: -<br>✓ MMA २०२० व्हिजन साध्य करण्यासाठी एक्स्प्लोरेशन टीमची स्थापना करणे.<br>✓ मंडळाच्या बदलत्या गरजेनुसार MMA चार्टर मध्ये आवश्यक ते बदल करणे. |
| जून | MMA २०२० व्हिजन एक्स्प्लोरेशन टीमची स्थापना: MMA 2011 विश्वस्तांच्या सहकार्याने राबविलेला | अनेक सभासदांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे |

| | | |
|---|---|---|
| | उपक्रम. | 'एक्स्प्लोरेशन टीमची' स्थापना सुरु झाली आहे. |
| | MMA च्या पोट-नियमांची उजळणी;<br>MMA 2011 विश्वस्तांच्या सहकार्याने राबविलेला उपक्रम. | अमेरिकेतील इतर महाराष्ट्र मंडळाच्या प्रमुखांशी संपर्क साधून काही निवडक मंडळांच्या पोट-नियमांच्या प्रती संदर्भासाठी गोळा केल्या आहेत. |
| | सेवा ह्या आंतरराष्ट्रीय संघटनेने आयोजित केलेल्या ‘हिंदू एकता दिवस" ह्या कार्यक्रमात सहभाग! | महाराष्ट्र मंडळाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि एकजुटीने कार्य करण्याच्या संधीचा लाभ घेण्यासाठी इतर १३ समाजाच्या प्रमुखांशी संपर्क साधला आहे. |

महाराष्ट्र मंडळाची उद्दिष्टे साध्य करण्यसाठी नवनविन उपक्रम राबविण्यात आम्ही व्यस्त आहोत. यापुढेही आपणा सर्वांचे असेच सहकार्य लाभेल हि अपेक्षा. अधिक माहितीसाठी mmatlanta@gmail.com वर इ-मेल करावे.

आपण एकत्रितपणे "संपर्कातून प्रगती" साध्य करूयात.........

**आपली २०११ समिती**

www.mmatlanta.org

www.facebook.com/mmatlanta

# सहामाही अहवाल

## जून ३०, २०११

### युवा संगमने NFCC येथे केलेला सामाजिक कार्यातील सहभाग (३ जानेवारी, २०११)






### मकर संक्रांत (१५ जानेवारी, २०११)









### भेटी – गाठी (२६ फेब्रुवारी, २०११)





# सहामाही अहवाल

## जून ३०, २०११

### युवा संगम मेळावा (२० मार्च, २०११)






### होळी रे होळी (१० एप्रिल, २०११)





### दीर्घकालीन योजना (१७ एप्रिल, २०११)





# सहामाही अहवाल

## जून ३०, २०११

### गुढी पाडवा ( ३० एप्रिल, २०११)










### २०११ समिती

